Indian Streams Research Journal
Volume 2, Issue. 6, July 2012
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# जुने वस्त्र विकि करणाऱ्या असंघटित महिला कामगारांचा अभ्यास – संदर्भ नांदेड शहर

*प्रकाश जाधव*

प्राचार्य
मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालय, अंबाजोगाई

***प्रस्तावना :–***
रक्ताचं पाणी करून भांडवलदाराची तिजोरी भरणाऱ्या असंघटित कामगारांना स्वतःचा उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. स्वातंत्र्याच्या 64 वर्षानंतर केन्द्र सरकारने कायदा केला परंतु त्याचा भार राज्य सरकारवर दिला परंतु महाराष्ट्र सरकारने कायद्याची अंमलबजावणी केली नाही. राज्यात 98 लाख असंघटित कामगारांचे आजही शोषण होत आहे. गेल्या अनेक वर्शामध्ये महागाईचा निर्देशांक वाढत आहे. परंतु सामान्य माणसाचे जीवन जगणे मुश्किल झाले आहे. देशात असंघटित उद्योग क्षेत्रात काम करणाऱ्या असंघटित कामगारांची संख्या 39 कोटी 49 लाख असल्याने केन्द्रीय कामगार मंत्रालयातील सर्वेक्षण सांगत आहे. याच्यातील एकूण 86 टक्के कामगार अत्यंत हलाखीचे जीवन जगत आहेत. त्यात असंघटित महिला कामगारांचा देखिल समावेश आहे. हजारो वर्षापासून गुलामगिरीत असलेली स्त्री स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करीत आहे.

परंतु सतत पैशाची चणचण असल्याने एका ठिकाणी बसून व्यवसाय करता येत नाही. भांडवलाची कमतरता असल्याने तुटपुंज्या पैशावर कसातरी व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करते. काही महिला घरोघरी हिंडून लोकांना नवीन भांडी, पोत इ. वस्तु विक्री करतात व त्या वस्तुच्या मोबदल्यात वापरलेले जुने कपडे घेतात. घेतलेले जुन्या कपडयांना धुवून, इस्त्री करून परत पुनर्विक्री करून परत बाजारात विकतात. या विक्रीतून जो नफा होतो त्यातून या असंघटित महिला उदरनिर्वाह करतात.

***स्त्रीचा आर्थिक व्यवस्थेत सहभाग***

भारतीय स्त्री प्राचीन काळापासून कामगाराची भूमिका पार पाडत आलेली आहे. त्यांना भांडी साफ करणे, राजदरबारातील पंखा हलविणे, सेवा करणे इत्यादी कामे हजारो वर्षापासून स्त्री करत आलेली आहे. स्त्री जेव्हा काम करते तेव्हा आर्थिक घडामोडीशी संबंधित असलेले मानवंश शास्त्रज्ञाच्या मते धान्य, कपडे, हस्तकला इत्यादी विविध साधने स्त्रिया निर्माण केले आहे. याबाबत इतिहासात अनेक पुरावे सापडतात. त्यात कापड विणने, शिवणे, सुत कातणे, मातीची खेळणी बनविणे, शेतीची कामे इ. कामे स्त्री करीत असत.

विटापासून घरे बनविण्याचे ज्ञान भारतीयांना प्राचीन काळापासून अवगत होते. सूत कातण्याची व वस्तु विणण्याची कला कमीत कमी चार हजार वर्षापासून अवगत होती असा उल्लेख वेद मंत्रात आढळतो. पंधराव्या शतकात सारा युरोप व आशिया भारतीय वस्त्राचे हुकमी गिऱ्हाईक होते. हयातून ओढ लागून भारताचा शोध घेण्याचा पाश्चात्य व्यापाऱ्यांनी धाडसी प्रयत्न केला. सूत कातण्याचा चरखा तर घरोघरी चालत होता. गावात हातमाग भरभराटीस आलेला होता. त्या काळाच्या अर्थव्यवस्थेत म्हणजे धर्म, संस्कृती, समाजरचना व आर्थिक व्यवहार हयांची अतूट सांगड होय.

भारतीय औद्योगिक व्यवस्थेत मनुष्यबळाला प्राधान्य देणारी श्रम प्रधान तंत्र पध्दती 1761 च्या पूर्वी अनेक शतके सर्वत्र प्रचलित होती. त्यात दोन प्रकारचा समावेश होता. एक शहरातील हस्तोद्योग व दुसरे ग्रामीण क्षेत्रातील ग्रामोद्योग. एकंदरित समाजाच्या गरजा कमी असल्याने वस्तुचे उत्पादन ग्रामोद्योग होत असे. वस्तु विनिमयाच्या (barter) पध्दतीमुळे किमती ठरविण्याचा प्रश्नच येत नव्हता. कारागिराने गावाच्या गरजा पुरवायच्या व गावाचे त्याच्या व कुटुंबियांचा योग क्षेत्र वाहायचा यायाच अर्थ ग्राम समाज पध्दत स्थिर होती. ही भारतीयांची पध्दत जगाच्या पाठीवर आढळून येत नाही. याचाच अर्थ असा की लघुउद्योगाचे प्रमाण अधिक असल्याने व ग्रामीण अर्थव्यवस्था समृध्दी होती व त्या समृध्दीत स्त्री व पुरूष यांचा समावेश होता.

***औद्योगिक कांती***

**Please cite this Article as :** *प्रकाश जाधव , जुने वस्त्र विकि करणाऱ्या असंघटित महिला कामगारांचा अभ्यास – संदर्भ नांदेड शहर* **: Indian Streams Research Journal (July ; 2012)**

औद्योगिक क्रांतीपूर्व काळात पुरूषाच्या बरोबरीने स्त्रिया काम करीत असे. तरी त्याची भूमिका अकुशल काम करण्याचीच होती. परंतु हळू हळू शिक्षणाचा प्रसार होत गेला आणि शारीरिक कष्ट कमी असलेल्या प्रशासकीय व्यावसायिक स्वरूपाची व बौध्दीक क्षेत्रातील बैठी कामे महिलांना दिली जाऊ लागली.

स्त्री आणि पुरूष यामधील नैसर्गिक भेद असले तरी कामेही स्त्रिया पुरूषा इतक्याच क्षमतेने पार पाडतात. परंतु अनेक देशात पुरूषाच्या तुलनेत स्त्रियांना अल्प वेतन दिले जाते. एका विद्युत वस्तु निर्मितीच्या कारखान्यात कार्यमापक तज्ञांनी स्त्रियांची कामे व पुरूषांची कामे असा भेद करून स्त्रियाचे वेतन संपते तेंव्हा पुरूषाची कामे असा भेद करून स्त्रियाचे वेतन संपते तेव्हा पुरूषाचा किमान पगार आरंभ होतो. परंतु बऱ्याच सीमावृत्ती कामात स्त्रियांची उत्पादन क्षमता पुरूषाहून अधिक असते.

अठराव्या शतकातील इंग्लंडमध्ये झालेल्या औद्योगिक क्रांतीनंतर उद्योग, मालक, भांडवलदार यांचा एक वर्ग व कामगार, कर्मचारी, श्रमिक असा दुसरा वर्ग स्वतंत्र उदयास आले. त्यापूर्वी जगभर शेतीप्रधान व्यवसायात गुंतलेली माणसे मुख्यतः स्वयंनियुक्त होती. नियोजकाने आदेश दिल्याप्रमाणे काम करणारे कर्मचारी यांचा औद्योगिक क्रांतीनंतर प्रामुख्याने मोठा वर्ग निर्माण झाला. आणि याच काळात कामगार वर्गाच्या शोषणाला सरूवात झाली.

औद्योगिक क्रांतीमुळे लघुउद्योग बंद झाले, ग्रामीण भागातील व्यवसाय मोडकळीस आला. नवीन नवीन तंत्रज्ञानामुळे मोठ मोठया बाजारपेठा उदयास येवू लागल्या. ग्रामीण भागातील लोक मजुरीसाठी शहराकडे जावू लागले. त्यामुळे खेडी ओस पडू लागले. भांडवलदार वर्गाला मजुरांचा पुरवठा अधिक असल्याने अल्पवेतनात त्यांच्याकडून कामे करून घेत असत.

### *स्त्री कामगार*

भारतात कोणत्याही व्यवसायात स्त्रियांचा वेगळया संघटना दिसून येत नाही. स्त्रियांना घरकामाकडे लक्षे द्यावे लागत असल्याने संघटनेच्या कार्यात लक्ष घालणे शक्य नव्हते. परंतु इ.स. 1890 मध्ये मुंबईतील कामगार पुढारी श्री. लोखंडे यांनी मुंबईत कामगारांचे प्रश्न सभातून मांडण्यास प्रारंभ केला त्यावेळी त्यांच्या जोडीने दोन स्त्रियांनीसुध्दा भाषणे केलेली होती. कालांतराने स्त्रियांची सदस्य संख्या वाढत गेली ती पुढील प्रमाणे

| | |
|---|---|
| 1929 | 3842 |
| 1946 | 247980 |
| 1957 | 311882 |
| 1966 | 314000 |
| 1972 | 316000 |
| 1974 | 422800 |

स्त्री संघटना नसल्यातरी संघटनेत स्त्रियांचा सहभाग मोठया प्रमाणात वाढत होता. भारतामध्ये स्त्रियांच्या सार्वजनिक जीवनात वावरण्याचा 100 वर्षाचा इतिहास आहे. स्वतंत्रता आंदोलनात गांधीजींबरोबर हजारो स्त्रियांचा सहभाग होता. आणि हीच राजकीय सहभागाची ती सुरूवात होती. 19 व्या शतकापर्यंत स्त्रियांना शिक्षणापासून वंचित ठेवले असल्याने त्यांना मुक्त करण्यासाठी समाज सुधारकाने प्रयत्न करून सर्वांगीन विकास साधावा. या दृष्टीकोनातून प्रयत्न केले त्यात सावित्रीबाई फुले यांना प्रथम शिक्षण देवून शिक्षीका बनविले. म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात पोस्ट ऑफीस, वाहतुक इत्यादी क्षेत्रात कामे करीत असतांना स्त्रिया दिसून येतात. गिरणी कामगार म्हणून त्याच काळात स्वतःच्या अधिकाराबद्दल जागृत झालेली स्त्री याच काळात आढळते. असंघटित क्षेत्रात स्त्रियांची शक्ती, अधिकार, आणि संरक्षण इत्यादी बाबत धोरण स्वातंत्र्यपूर्व काळात झालेली आढळतात. परंतु कष्टकरी म्हणून मोठया प्रमाणावर काम करणाऱ्या स्त्रियांचा विचार स्वातंत्र्यानंतर कल्याणकारी राज्यात झालेली नाही.

1890 च्या नंतर स्त्री कामगारांचा कामगार म्हणून विचार करण्यात येऊ लागला. कारण 1890 च्या कामगाराच्या पहिल्या जागतिक परिशदेत स्त्रियांच्या व मुलांच्या कामाचा आढावा घेण्यात आला. 1811 च्या फॅक्टरी ॲक्ट अन्वये स्त्रियांच्या कामाचे तास साप्ताहिक सुटटी, कामाचे मर्यादित दिवस, दिवसाकाम देण्यात येवू लागले. 1929 सालापासून आठ आठवडयांची प्रसुती रजा मंजुर करण्यात आली. 1939 व 1948 कारखाना कायद्याने घातक व ताण पडणाऱ्या कामावर स्त्रियांना न ठेवण्याचे बंधन आहे. परंतु असंघटित महिलांना आजही कायदेशीर कल्याणकारी सुविधा, समानवेतन, पेन्शन, आठवडी सुटी नाही. 1881 सालच्या शिरगणतीप्रमाणे मोठया उद्योगात व संघटित क्षेत्रात काम करणारी स्त्री महिन्याला सरासरी 963 रू. मिळवते, असंघटित लहान उद्योगात काम करणारी सरासरी 220 रू. मिळवले. हे आकडे जमेत धरून जर हिशोब केला तर असे म्हणता येईल की राष्ट्रीय संपत्तीत स्त्री 14 ते 16 टक्के भर पडते.

कारखाना कायदा 1948 मधील महिला कामगारा विषयी अनेक तरतुदी आहेत. त्यात समान काम समान वेतन, पाळणाघराची सोय, रात्रपाळीत कामे स्त्रियांना नको, व स्त्रियांना संरक्षणात्मक तरतुदी केलेल्या आहेत. परंतु असंघटित महिलासाठी कुठल्याही तरतुदी नाहीत. इ.स. 1947 मध्ये कारखान्यातील एकूण 22.75 लाख कामगारापैकी 2.64 लाख म्हणजे 11.6 टक्के स्त्रिया होत्या.

### *संशोधनाचे महत्व*

कुटुंबातील सर्वात जास्त शोषित घटक कोण असेल तर ती स्त्री होय. ती गुलामाची गुलाम असल्यामुळे तिची अवस्था अतिशय दयनीय व शोचनीय अशा प्रकारची आहे.

स्त्री आर्थिक दृष्टया परावलंबी आहे. चूल आणि मूल याला बांधली गेली आहे. त्यातून बाहेर पडली तर श्रमाच्या कामात आणखीनच भरडली जाते. जगाच्या लोकसंख्येच्या 50 टक्के स्त्रिया आहेत. पण त्या एकूण कामाच्या 2/3 काम करतात. तरीही एकूण कामाच्या मोबदल्यापैकी फक्त 10 टक्के मोबदला स्त्रियांच्या वाटयाला येतो.

देशाच्या लोकसंख्येत वर्षाकाठी साधारणतः 165 लाखाची भर पडते आहे. त्यातील 40 टक्के वाढ कामगार व कष्टकरी वर्गातील असावी असा अंदाज आहे. म्हणजेच 65 लाख कामगारांची दरवर्षी कामगार क्षेत्रात भर पडत आहे. अर्थमंत्रालयाच्या सर्वेक्षणानुसार 1991 ते 2008 या काळात दरवर्षी साधारणपणे 1 लाख 27 हजार कामगारांना संघटित क्षेत्रात रोजगार मिळाला. इतर 64 लाखावर असंघटित कामगार रिक्षाचालक, शेतमजुरी, बांधकाम व इतर कामे करणारे कामगार यांचा समावेश आहे. या कामगारांना कोणतेही संघटना कामाचे तास, वेतन, कल्याणकारी सुविधा, समाजाकडून मानसन्मान मिळत नाही. आजपावेतो या महिलांना स्वातंत्र्याची फळे चाखता आली नाहीत ही एक फार मोठी शोकांतिका आहे. म्हणून असंघटित महिला जे जुने वस्त्राच्या मोबदल्यात नवीन भांडे देवून मिळणाऱ्या नफयातून त्यांचा व त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह कसे करते हे संशोधन करणे महत्वाचे आहे.

### *समस्या सुत्रण*

स्वतंत्र भारताची स्वतंत्र राज्यघटनेत सर्वांगीण विकासाला प्राधान्य दिले आहे. प्रत्येक राज्याने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्विकृत केली. परंतु सद्यस्थितीत असंघटित महिलांना कल्याणकारी सुविधा उपलब्ध नाहीत सद्यस्थितीत असंघटित महिला कोणताही उद्योग व्यवसाय करण्यास तयार आहेत. परंतु भांडवल कमी असल्याने त्या नाईलाजास्तव इतर व्यवसाय करतांना दिसून येतात. त्यात नवीन भांडी देवून जुने कपडे घेणे व त्या बाजारात इस्त्रीकरून विकणे हा देखिल असंघटित महिलांचा व्यवसाय प्रत्येक शहरात दिसून येतो. नांदेड शहरात देखील आठवडयातून एकदा रेल्वेस्टेशनच्या बाजुस रस्त्यावर बसून कपडे विकि करतात. श्रीमंत माणसांनी काही दिवस वापरलेले कपडे घेवून त्याच्यावरच यांचा व्यवसाय चालतो. या प्रकियेला दररोज पाच ते सात किलोमिटर अंतर शहरात चालावे लागते. समाजाकडून असंघटित महिलेला सन्मानाने पाहिले जात नाही. हा व्यवसाय करतांना त्यांच्यासोबत त्यांची मुले देखील असतात. म्हणून मुलांना चांगल्या संस्कारापासून वंचित रहावे लागते. तसेच शिक्षणही त्यांना व्यवस्थित मिळत नाही. दररोज काम करावे लागत असल्याने हिवाळा, पावसाळा, उन्हाळा यांचाही सामना करावा लागतो. तसेच या व्यवसायाने आपल्या संस्कृतीनुसार सण उत्सव साजरा करतांना अनेक अडचणी दिसून येतात. सदरील असंघटित महिलेला आठवडयाची सुटटी नसते किमान वेतनाची हमी नसते. सामाजिक सुरक्षिततेचा अभाव आहे. पेन्शन शासनाकडून मंजुर केली जात नाही. त्यामुळे फार मोठी रक्कम अशी बचत करता येत नाही. नगर पालिकेने बाजाराची जागा उपलब्ध न दिल्याने त्यांना रस्त्याच्या कडेला धुळीत कपडे विक्री करावे लागते. या व्यवसायातून तुटपुंजा नफा मिळत असल्याने उदरनिर्वाह करणे अवघड होते. अशा अनेक समस्या असंघटित महिलामध्ये दिसून येतात.

### *संशोधनाचा उद्देश*

1.जुनी वस्त्र विक्री करणाऱ्या असंघटित महिला कामगारांचा ऐतिहासीक व कौटुंबिक स्थितीचा आढावा घेणे.
2.जुने वस्त्र विक्री करणाऱ्या महिला कामगारांच्या मुलांचा शिक्षणाचा शोध घेणे.
3.या व्यवसायापासून मिळणारे उत्पन्न व बचत यांचा शोध घेणे.
4.या व्यवसायापासून येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

### *संशोधन पध्दती*

नांदेड शहरात जुने कपडे विक्री करणाऱ्या असंघटित महिला व्यवसाय करतात. प्रत्येक दिवशी शहरात स्टिल व प्लॉस्टीकची भांडी देवून त्यांच्या मोबदल्यात त्यांच्याकडून जुने कपडे घेवून परत त्यांना घरी स्वच्छ धुवून, तुटलेले बटन लावणे, तुरपई करणे व इस्त्री करून हे कपडे बाजारात पुनर्विकी करतात. आठवडयाच्या प्रत्येक शुक्रवारी रेल्वेस्टेशनच्या बाजुस गोकूळ नगर येथे सकाळी साडेपाच वाजता पंधरा ते वीस महिला जुन्या कपडयाची पाहणी व मांडणी करतात. महिलेची संख्या निश्चित माहित नसल्याने गैरसंभाव्यता नमुना निवडीचा वापर करून त्यातील पाच महिलांचा उद्देशपूर्ण तंत्राचा वापर करून पाच महिला संशोधनासाठी निवडण्यात आल्या आहेत. निवडण्यात आलेल्या नमुन्यामधून प्राथमिक व द्वितीय स्त्रोताचा वापर करून तथ्य संकलन करून व्यश्टीअध्ययन केलेले आहे. आलेल्या तथ्यांचे रूपांतर निश्कर्शात केलेले असून त्यावरून सूचना मांडलेल्या आहेत.

### *व्यष्टीअध्ययन क. 01*

अनिता रवी उघडे वय 18 वर्ष धर्म व जात जोशी या अशिक्षित असून स्वतःच्या घरात गणेश टॉकीज चिराग गल्ली नांदेड येथे राहतात. सदरील महिला जुने वस्त्र विकी करणाऱ्याचे ठिकाण रेल्वे स्टेशन येथे आहे व त्यांचे पती रवी उघडे नारळ पाणी विक्रीचा व्यवसाय करतात. सध्या यांचे कुटुंब संयुक्त असून सासू सासरे देखील जुने कपडेचा विक्रीचा व्यवसाय करतात. अनिता रवी उघडे यांचे नाव मतदार यादीत नाही. त्यांच्याकडे शिधापत्रिका आहे. या कुटुंबाने शासकीय योजनेचा फायदा घेतला नाही. हा व्यवसाय उदरनिर्वाहाचे साधन म्हणून आठ वर्शापासून व्यवसाय करतात. त्या व्यवसायात स्टिलचे भांडे व प्लास्टीकचे भांडे देवून जुने वस्त्र घेतात. या व्यवसायातून पाच हजार रूपया पेक्षा कमी मासिक उत्पन्न मिळते. दररोज या व्यवसायातून सहा ते आठ तास हा व्यवसाय करावा लागतो. या विक्रीसाठी त्यांना दररोज दोन ते पाच किलोमिटर पायी चालावे लागते. आणि त्यांच्या डोक्यावर स्टीलचे भांडे व प्लास्टीकच्या भांडयाचे वजन असते. मिळणाऱ्या उत्पन्नातून बचतगटाच्या माध्यमातून 100 रू. बचत करतात. एखादी आर्थिक अडचण निर्माण झाल्यास व्याजाने सावकाराकडून पैसे काढतात.

### *व्यष्टीअध्ययन क. 02*

सुरेखा गंगाधर बुरसे, वय 60 वर्ष जात जैन धर्म हिंदु अशिक्षीत असून सध्या महादेव पिंपळगाव नवी आबादी खंडोबा नगर नांदेड येथे राहतात. त्यांच्या कामाचे ठिकाण भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखाना देगाव हे आहे. सदरील महिलेला दोन मुले असून पहिला मुलगा श्री. गोविंद बुरसे वय 24 शिक्षण आयटीआय. दुसरा मुलगा वय 12 वर्ष इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेत आहे. एक मुलगी वय 34 वर्ष व्यवसाय कपडे विक्री. सदरील कुटुंब हे विभक्त कुटुंब असून वरील नाव दर्शविलेले सर्व सदस्य एकत्र राहतात. या कुटुंबाचे मतदान, दारीद्रयरेशेखालील आणि शिधापत्रिका मध्ये नाव नोंदणी झालेली आहे. या महिलेने राजीव गांधी घरकुल योजनेचा फायदा घेतलेला आहे. सदरील महिला आठ वर्षापेक्षा जास्त व्यवसाय करते. या उत्पन्नातून पाच हजार पेक्षा कमी मासिक उत्पन्न आहे. हे व्यवसाय दिवसातून सहा ते आठ तास कामे करावे लागते. दोन ते पाच किलोमिटर पायपीट करावी लागते. या व्यवसायाव्यतिरिक्त कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने या उत्पन्नात ते समाधानी नाहीत. तुटपुंज्या मिळणाऱ्या उत्पन्नातून बचत करतात. तसेच मिळणाऱ्या उत्पन्नातून मुलांचे शिक्षणही पूर्ण करतात. काही वेळा गरजेनुसार शेजारी लोकांडून रक्कम उसने घेवून ती गरज भागविली जाते.

### *व्यश्टीअध्ययन क. 3*

लक्ष्मीबाई तुळशिराम वाकोडे, वय 28 वर्ष जात गोंधळी, धर्म हिंदु अशिक्षीत असून त्या लव्हार गल्ली नांदेड येथे रहातात. सदरील महिलेचे जुने वस्त्र विक्री करण्याचे ठिकाण हे रेल्वेस्थानक व रविवारचा बाजार हे आहे. सदरील महिलेला एक भाऊ 27 वर्शाचा असून शिक्षण निरंक असल्याने कपडे विक्रीचाच व्यवसाय करतो. एक चुलती ही देखील कपडे विक्री करते. रमेश वाकोडे वय 28 चुलता कपडे विक्रीचा व्यवसाय करतो. सदरील महिलेला स्वतःचे घर असून कपडे विक्रीचा व्यवसाय करतात. ही महिला संयुक्त कुटुंबात रहाते. या महिलेचे मतदार यादीत आणि शिधापत्रिकेत नाव नसल्याचे दिसून आले. ही महिला दारीद्रय रेशेमध्ये समाविष्ट आहे. या महिलेने शासकीय योजनेचा कोणताच फायदा घेतल्याचे दिसत नाही. सदरील महिला हा व्यवसाय आठ वर्षापासून करते. या व्यवसायासाठी सहा ते आठ तास घराबाहेर काम करावे लागते व उर्वरित वेळेत घरातील

काम व स्वयंपाक करणे इत्यादी काम करावे लागते. एकूण कामाचे तास बघितले असता दिवसातून 11 ते 12 तास काम करत असल्याचे दिसून येते. या व्यवसायातून चार ते साडेचार हजार रूपये उत्पन्न मिळत असल्याचे सांगितले. या व्यवसायाव्यतिरिक्त कोणतेही इतर उत्पन्नाचे साधन नाही. मिळणाऱ्या उत्पन्नातून बचतगटाच्या माध्यमातून बचत करत असल्याचे दिसून आले. कौटुंबिक आजार आल्यास शासकीय रूग्णालयाचा फायदा घेतला जातो. सदरील महिलेने असंघटित महिलांसाठी पेन्शन, घरकुल योजना शासनाने बांधून द्यावे असे मत व्यक्त केले.

### *व्यष्टीअध्ययन क. 4*

अनिता मोहन वाकोडे वय 35, जात गोंधळी, धर्म हिंदु शिक्षण सातवीपर्यंत सध्या कुंभारगल्ली गणेश टॉकीज येथे भाडयाच्या घरात रहाते. या महिलेच्या पतीचे शिक्षण तीसरीपर्यंत झालेले आहे. हे सुध्दा कपडे विक्रीचा व्यवसाय करतात. या महिलेस नितेश वाकोडे वय 22 वर्ष मुलगा असून तो सध्या हमाली हा व्यवसाय करतो. तसेच त्यांचा दुसरा मुलगा 10 वर्षाचा असून हा मुलगा कपडे विक्रीसाठी मदत करतो. सदरील कुटुंब हे किरायाच्या घरामध्ये रहाते. या महिलेचे मतदार यादीमध्ये नाव आहे. या महिलकडे दारीद्रय रेशेखालील कार्ड नाही तसेच शिधापत्रिकाही नाही. सदरील महिलेचा परंपरागत व्यवसाय असून दररोज सहा ते आठ तास काम करावे लागते. तसेच आठ ते दहा किलोमिटर पायी चालावे लागते. या महिलेचे मासिक उत्पन्न चार ते पाच हजार असून इतर दुय्यम व्यवसाय करत नाहीत. या महिलेकडून कुठलिही बचत केली जात नाही. आजारासारखी इतर अडचण आल्यास सावकाराकडून पाच ते दहा टक्क्याने कर्ज घेवून ती अडचण भागविली जाते. या व्यवसायासाठी महिलेले आठ तास गावातून फेरीकरून कपडे जमा करत असल्याने त्यांना विक्रीसाठी महानगर पालिकेच्या रस्त्यावर बसावे लागते. त्याचा कर महानगरपालिकेला दररोज पाच रूपयाप्रमाणे भरला जातो. कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यास शासकीय रूग्णालयात उपचार घेतले जातात. सदरील महिलेने आर्थिक स्तर उंचावण्यासाठी शासनाकडून मदत घेण्याचा प्रयत्न करते.

### *व्यष्टीअध्ययन क. 5*

अंजनाबाई हरी उघडे वय 50, जात गोंधळी (भटकी जमात), धर्म हिंदु, पत्ता कुंभार गल्ली ता. जि. नांदेड येथे किरायाच्या घरात रहातात. सदरील महिलेचे जुने वस्त्र विक्री करण्याचे ठिकाण रेल्वेस्टेशन जवळ व शुक्रवार बाजार येथे आहे. सदरील महिलेला पती हरी उघडे निरक्षर असून कपडे विक्रीचा व्यवसाय करतात. या महिलेला दोन मुले असून रमेश व विजय अनुक्रमे वय 35 व 29 शिक्षण निरक्षर मुलेसुध्दा कपडे विक्रीचा व्यवसाय करतात. सदरील महिलेचे मतदार व शिधापत्रिकेत नाव आहे. परंतु दारिद्रयरेशेखाली अद्याप पर्यंत नाव नोंदल्याचे दिसून येत नाही. सदरील परंपरागतपणे हा व्यवसाय करत असून दररोज सहा ते आठ तास कपडे विक्रीचा व्यवसाय करते. आणि आठ ते दहा किलोमिटर पायी चालत असते. पाचहजार पेक्षा कमी उत्पन्न असल्याने या उत्पन्नावर त्या समाधानी नाहीत तसेच आर्थिक अडचण असल्यास सावकाराकडून कर्ज घेवून अडचण भागवितात. या व्यवसायातून महानगर पालिकेला पाच रूपयाची पावती दररोज फाडली जाते. या कुटुंबातील व्यक्ती आजारी पडल्यास शासकीय रूग्णालयात उपचार केला जातो. व पुढील काळात जीवनात आर्थिकदृश्टया सबल व्हावे यासाठी चांगले रहावे व सरकारने मदत करावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

### *निष्कर्ष*

1 एकूण पाच असंघटित महिला पैकी चार महिला या भटक्या जमातीच्या दिसून आल्या व एक महिला जैन धर्माची दिसून आली.
2 या पाच महिलेपैकी चार महिला अशिक्षीत आहेत व एक महिला सातवीपर्यंत शिक्षण घेतलेली आहे.
3 दररोज सहा ते आठ तास व घरातील कामे असा मिळून अकरा ते बारा तास काम करतांना या महिला दिसून येतात.
4 या व्यवसायासाठी सहा ते दहा किलोमिटर पायी चालावे लागते. तसेच या व्यवसायातून मिळणारे मासिक उत्पन्न पाच हजारापेक्षा कमी दिसून आले.
5 या व्यवसायात संपूर्ण कुटुंब जुने कपडे विक्रीचाच व्यवसाय करत असल्याने त्यांच्यामुलाकडे शिक्षणासाठी लक्ष देता येत नाही.
6 या पाच महिलापैकी एकाच महिलेने राजीव गांधी घरकुल योजनेचा फायदा घेतला. तसेच पाच पैकी दोन महिलेचे दारीद्रयरेशेखाली नावे आहेत.
7 या पाच महिलेपैकी दोन महिला बचत करतात. तसेच तीन महिलेकडे शिधापत्रिका आहेत. दोन महिलाकडे शिधापत्रिका नाहीत.
8 पाच कुटुंबापैकी दोन कुटुंबातील मुलांनी शिक्षण घेतले आहे. या दोन पैकी एकाचे आयटीआय शिक्षण घेतलेले आहे. व दुसऱ्या कुटुंबातील सदस्यांनी बी.ए. पर्यंत शिक्षण घेतलेले आहे. तो कटलरी व्यवसाय करतो.

### *सूचना / शिफारशी*

1 शासनाने किमान वेतन असंघटित कामगारांना लागू करावे.
2 असंघटित महिला, पुरूश कामगारांना पेन्शन योजना लागू करावी.
3 असंघटित महिलांच्या कुटुंबातील मुलांना शिक्षण दिले पाहिजे.
4 शिधापत्रिका तसेच बेघर कुटुंबांना घरकुल योजनेचा लाभ द्यावा.
5 या व्यवसाय करणाऱ्या महिलांना बॅकेने कर्ज उपलब्ध करून द्यावे.

### *संदर्भ*

1 डॉ. ताटके निलम, डायमंड समाजकार्य कोश, डायमंड पब्लिकेशन पुणे
2 वैद्य शांता, सुधा कुलकर्णी, श्रमशक्ती, सुधावैद्य प्रकाशन, महिला दक्षता समिती, मुंबई प्रथम आवृत्ती 1889
3 पंडीत विवके, महाराश्ट्रातील निवडक क्षेत्राचा आढावा, पब्लिक ट्रस्ट मुंबई.
4 डॉ. तळवळकर नंदिनी (चौधरी) महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडी योगदान, अल्फा पब्लिकेशन नांदेड, प्रथमआवृत्ती डिसेंबर 2008.
5 जोशी बी.आर. संपादक, डायमंड सामाजिक विज्ञान कोश, खंड दोन, डायमंड पब्लिकेशन पुणे.
6 यशवंत अ. पंडीतराव, भारतातील ग्रामीण औद्योगिकरण, प्रकाशक शैला यशवंत पंडीतराव, गोरेगाव पहिली आवृत्ती 2000.
7 गर्गे स. मा., संपादक भारतीय समाज विज्ञान कोश, खंड –2, संचालक समाज विज्ञान मंडळ, शिवाजीनगर पुणे.
8 http:/www.agrowon.com/agrowon